**International Journal of Advance and Applied Research (IJAAR)**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**

**ISSN – 2347-7075**
**Vol. 1 No.1**
**Sept – Oct2013**

**Librarian Sci.**

# "आधुनिक युगातील ग्रंथपालाची भुमिका व आव्हाने : एक अध्ययन"

नाजीम हुसैन अहमद शेख
ग्रंथपाल, मोहसीनभाई जव्हेरी कॉलेज, देसाईगंज (वडसा)

**सरांश :**
एकविसाव्या शतकाच्या अविश्वसनीय बदलामुळे ग्रंथपालाला पारंपारिक कर्तव्याशिवाय काही नविन आव्हाने स्विकारुन त्यांची अमलबजावणी करणे हि काळाची गरज आहे. अभ्यासक्रमानुसार उपभोक्त्यांना लागणाऱ्या माहिती स्त्रोतांची निवड करून ते प्राप्त करणे तसेच त्यानुसार कोणते ग्रंथ वाचावे व त्यातुन माहिती कशी प्राप्त करावी याबाबत मार्गदर्शन करणे ही प्राध्यापकांची भुमिका पार पाडावी लागेल. Library is a Learning Resources Centre ग्रंथालय हे ज्ञान प्राप्तीचे प्रमुख स्त्रोत आहे. त्याकरिता इंटरनेटच्या माध्यमातून माहितीचे नविन स्त्रोत निर्माण करण्याची भुमिका वठवावी लागेल.

**प्रास्ताविक :**
ग्रंथपाल हा माहितीच्या सतत संपर्कात असतो. माहिती तंत्रज्ञानाच्या दैनंदिन वापरामुळे शैक्षणिक व विशेषतः ग्रंथालयातील कार्यामध्ये आश्यर्चकारक बदल झालेला दिसून येतो. आज 'ग्रंथालय' हा शब्द 'मागे पडलेला असून त्याऐवजी 'माहिती केंद्र' हा शब्द रूढ झाला आहे. तसेच 'ग्रंथपालाला' पर्यायी शब्द म्हणून 'माहिती संशोधक' असा शब्द प्रयोग होत आहे. Blaise Gonin या विद्वानाने ता आधुनिक ग्रंथपालांना 'इलेक्ट्रॉनिक ग्रंथपाल' (Electronic Librarian) अशा संज्ञेने संबोधिले आहे. अगदी अलिकडच्या काळात तर Cyber Librarian हे त्यांचे पदनाम झाले आहे.

शैक्षणिक संस्थेत तसेच विशेषतः ग्रंथालयात ग्रंथपाल हा ग्रंथपालाना सोबतच माहिती अधिकाऱ्याची दुहेरी भुमिका वठवितांना दिसतो. युनेस्कोने केलेल्या सर्वेक्षणानुसार ग्रंथपाल या पदाला खालील शब्दप्रयोग वापरण्यात आले आहे.

1) माहिती संशोधक
2) माहिती व्यवस्थापक
3) माहिती विश्लेषक
4) माहिती वितरक
5) माहिती सेवक

युनेस्कोच्या अहवालानुसार इ.स. च्या सुरवातीपासून 16 व्या शतकात जेवढ्या ज्ञान शाखांचा अभ्यास झाला त्याच्या आठपट 1960-70 या काळात झाला आहे. संगणकाच्या वापरामुळे ग्रंथालय क्षेत्रात आमुलाग्र क्रांती घडून आली आहे. इंटरनेटद्वारे तर संपूर्ण जग हे याद्वारे मिळणाऱ्या माहितीचे स्वरूप प्रचंड आहे. ग्रंथालयात इलेक्ट्रॉनिक माध्यमाच्या वापरामुळे 21 व्या शतकाच्या सुरवातीला ग्रंथालयाच्या स्वरूपात फार मोठा बदल घडून येतो आहे. माहितीचा विस्फोट, उपभोक्त्यांची माहिती गरज यामुळे ग्रंथालयासोबत ग्रंथपालाच्या भुमिकेमध्ये बदल घडून येताना दिसून येतो.

उद्दीष्टे :

1) बदलत्या युगात ग्रंथालयात माहिती तंत्रज्ञानाचे महत्व विषद करणे.
2) माहिती तंत्रज्ञानाचे ग्रंथालयात येणाऱ्या आयोजकांना माहितीच्या साठ्याबाबत जागृत करणे.
3) ग्रंथालय व्यवस्थापनामध्ये संगणकीकरण व आधुनिक संसाधनांची उपयोगीतेचा अभ्यास

करणे.

**1) ग्रंथपालाची शिक्षकाची भुमिका :**

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे केवळ पुस्तकप्राप्त करून फक्त देवाणघेवाण एवढेच कामाकरिता आपले कार्य मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासाच्या दृष्टीने कोणते ग्रंथ उपलब्ध आहे व कोणत्या विषयातील उपभागातील कोणत्या पुस्तकात चांगल्या प्रकारे माहिती आहे, हे सांगीतले तर विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होतो व अध्ययनाचे कार्य केल्याचे त्याला समाधान मिळते. अशा तऱ्हेची अध्ययनाची महत्वाची भुमिका पार पाडावी लागणार आहे. ही भुमिका पार पाडण्यासाठी ग्रंथपालाला महाविद्यालयातील शिकवल्या जाणाऱ्या सर्व अभ्यासक्रमाच्या पाठ्यक्रमाचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे. त्यामुळे ग्रंथपाल विद्यार्थ्यांना उपयोगी व पचणी पडेल अशा भाषेत शकतो व विद्यार्थी व शिक्षक हे नाते जुळून येऊ शकते.

**2) इलेक्ट्रॉनिक माध्यमे व ग्रंथालये :**

संपर्क साधू इलेक्ट्रॉनिक माध्यमे व ग्रंथालये हे माहिती प्रलेख आणि दृक्यश्राव्य रेषा, चित्रीय साधनांचे भंडारगृह आहे. जे टायपींग, पुस्तके, नियतकालिके, पोस्टर्स आणि अहवाल माक्रोफिल्मस्, स्लाईडस् फिल्मस्, व्हि.डी.ओ., ऑडिओ, ऑप्टीकल डिस्क, मॅग्नेटिक्स टेप्स्, फ्लापी डिस्क इत्यादी सारख्या विविध माध्यमाने संग्रहित असतात.

**३) सायबर लायब्ररियनची भुमिका :**

इंटरनेटचा वापर बराच वाढला आहे. पण त्यातून कोणते सर्च इंजिन वापरावे व माहिती शोधण्यासाठी कोणत्या संज्ञाचा वापर करावा हे बऱ्याचजनांना माहित नसते. अशा तऱ्हेने माहिती शोधण्यास मदत करण्याचे कार्य ग्रंथपालास करावयाचे आहे. संशोधन किंवा वैज्ञानिक ग्रंथालयात आवश्यक असणारी नियतकालिके इंटरनेटवर देखील उपलब्ध आहे. आपल्या उपयोगी पडणारी कोणती नियतकालिका आहे हे ग्रंथपालाने जाणून घेवून ग्रंथपालाने त्यातून प्राप्त माहिती डाऊनलोड करून माहितीचा डाटाबेस तयार करणे.

**४) बाल ग्रंथपालाची प्रसिद्धी :**

बालकांमध्ये वाचनाची गोडी रूजविण्यासाठी ग्रंथालये महत्वाची भुमिका वठवू शकतात. त्याचप्रमाणे बालकांवर चांगले संस्कार होण्यासाठी ग्रंथपालाची वृत्तपत्रात जाहीरात करणे हे सर्वात महत्वाचे कार्य होय. तसेच वाचनालयातील ग्रंथसंपदा बदलविणे सर्वात आवश्यक आहे. कम्पुटर व इंटरनेटच्या माध्यमातून आधुनिक माहिती मिळविता येते.

**5) ग्रंथपालाच्या अंगी बदलत्या काळानुसार असणारे गुण :**

1) वाचकाप्रति कर्तव्य
२) वाचन साहित्य प्रति
3) व्यवसायिक कर्तव्य
४) कर्मचाऱ्याप्रति कर्तव्य
5) स्वतःबद्दलची कर्तव्य

**६) बदलत्या व्यवस्थापनात ग्रंथपालाची भुमिका :**

संघटनात्मक बदल हा ग्रंथालयाच्या अस्तित्वासाठी आवश्यक असल्याने बदलाविषयक निर्णय ग्रंथपालाला घ्यावेच लागतात. अशा बदलास व्यवसाय संघटना व ग्रंथालय कर्मचाऱ्याकडून तीव्र विरोध असताना देखील ग्रंथालयात बदलाविषयक धोरणे राबवावीच लागतात. अर्थात काही वेळा असे निर्णय कर्मचारी स्वेच्छेने स्विकारतातदेखील. कर्मचारी व संघटनांचा विरोध कमी करण्यासाठी खालील उपाययोजना अंमलात आणता येवू शकतात. बदलत्या काळात ग्रंथालयामध्ये संगणक व इंटरनेटच्या माध्यमातून ज्ञानाचे व्यवस्थापन करणे महत्वाचे झाले आहे. वाचकांच्या व संशोधकांच्या विविध प्रकारच्या ज्ञानाच्या गरजा या माध्यमातून पूर्ण होवू शकते.

1) कर्मचाऱ्यांचा सहभाग
2) प्रशिक्षण
3) अचूक संदेशवहन

4) मत परिवर्तन

5) नियोजित बदल

**७) ग्रंथपालन व्यवसायाला मिळालेली संधी:**

महाविद्यालयीन ग्रंथालयात संधीचा शोध घ्यावा लागतो. ग्रंथालयातील बदल, तंत्रज्ञानात आलेले बदल ग्रंथपालन हा व्यवसाय आहे. व्यावसायिक संधीचा समावेश बाह्य बाजूमध्ये केला जातो. विचारात घ्यावे लागतात. व्यावसायिक संधी सर्वांसाठीच उपलब्ध असतात.

**अ) ग्रंथालयाचे संगणीकरण :**

संगणक तंत्रज्ञान, इत्यादीमध्येप्राथमिक माहिती, व्यवस्थापकाच्या मनात प्रकर्षाने जाणवत आहे. प्रत्येक ग्रंथपाल आपल्या ग्रंथालयाचे लवकरात लवकर प्रगत ज्ञान आत्मसात करण्याची गरज प्रत्येक ग्रंथालय माहितीशास्त्र प्रसारण / दळणवळण तंत्रज्ञान तसेच नेटवर्कींग संगणीककरण करण्याच्या प्रयत्नात आहे.

ब) **बारकोड तंत्रज्ञानाचा वापर :**

ग्रंथालयांमध्ये बारकोड तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला आहे. बारकोड वरून आपल्यावर संपूर्ण ग्रंथाची ओळख होऊ शकते.

**क) | वेगवेगळ्या माध्यमातून निधीची जमवाजमव :** ग्रंथालयाला निधी हा केंद्र शासनाकडून मिळतो तसेच राज्य शासनाच्या समाजकल्याण अंतर्गत व व्यवस्थापन कमेटीद्वारे व देणगी स्वरूपात अशाप्रकारे ग्रंथालयाला निधीची जमवाजमव करावी लागते.

**ड) पेन ड्राईव्हची उपलब्धता :** फ्लापी आणि सीडी प्रवासात खराब होतात. त्यालाच पर्याय म्हणून पेन ड्राईव्ह बाजारात आलेला आहे. त्याची साठवण क्षमता प्रचंड आहे.

**इ) व्हर्च्यूअल क्लासरूम :** ज्याप्रमाणे कोणतेही ग्रंथ त्याचा आकार, वस्तुस्थिती स्वरूपात उपलब्ध नसतात. तसेच नियतकालिके वाचनाची जागा किंवा सहाय्यक कर्मचारी यांचे देखील स्थान नसते. परंतु वर्गातील विद्यार्थ्यांना निवडक माहिती हे प्रसारण सरळ वितरीत केल्या जाते. ते बहुदा मात्र ईलेक्ट्रॉनिक्स स्वरूपात असते.

अशाप्रकारे ग्रंथपालानी स्वतःच्या योजना आखून निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. कारण अनुदानाशिवाय इतर माध्यमाद्वारे निधी उपलब्ध झाला तर माहिती तंत्रज्ञानातील सर्व सेवा आपण वाचकांसाठी उपलब्ध करू शकतो. तेव्हा ग्रंथपालानी सतत सावध असावे.

**८) आधुनिक युगात ग्रंथपालासमोर आव्हाने:**

माहितीचा विस्फोट, दळणवळणाची नविन साधने, संगणकाचा वाढता वापर, माहिती तंत्रज्ञानाचे भारत सरकारने व महाराष्ट्र शासनाने मान्य केलेल धोरण, अपुरा निधी, तांत्रिक क्षमता असलेल्या मनुष्यबळाची कमतरता ही व अशी अनेक आव्हाने आधुनिक युगातील ग्रंथपालासमोर आहे.

भारतासारख्या विकसनशील देशात साधन सामुग्रीची कमतरता आहे. परंतु उत्तम माहिती साधनांचा साठा उपलब्ध आहे. या माहिती साठ्याचा योग्य पद्धतीने परिणामकारक वापर होण्याकरिता एकविसाव्या शतकातील ग्रंथपालानी नविन तंत्रज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष :**

१) एकविसाव्या शतकातील ग्रंथपाल कमितकमी वेळामध्ये जास्तीतजास्त उपयुक्त कसा ठरेल याकरिता स्पर्धा सुरू झालेली आहे.

२) एकविसाव्या शतकात ग्रंथपालाना ग्रंथालयाचा विकास साधावयाचा असले तर ग्रंथपालानी स्वतःला समाजाभिमुख बनले पाहिजे.

३) एकविसाव्या शतकात संस्था ग्रंथपाल हे ज्ञान व्यवस्थापक व माहिती परिक्षक असतील.

४) एकविसाव्या शतकातील ग्रंथपालाकडे व ग्रंथालयाकडे माहिती सल्लागार केंद्र म्हणून ओळखल्या जावू लागले आहे.

५) भविष्यात पायबर लायब्ररीयनची गरज अधिक वाढल्यामुळे ग्रंथपालानी व माहिती तज्ञांनी हे आव्हाने पेलण्यास समर्थ होणे एकविसाव्या शतकाचे आव्हान आहे.

नाजीम हुसैन अहमद शेख

**संदर्भ सूची :**

1) Ramesh, L.S.R.C.V. "SWOT Analysis of Impact of Imformation Techonology on Indian Libraries". Indian Journal of Information, Library & Society; Jan - Jun 2004 P. No. 70-74
2) शिंदे पी.एम., व्यावसायिक संदेश वहन, कैलाश प्रकाशन, औरंगाबाद, 2003 पा.क्र. 80 ते 85
3) WWW. google com - SWOT Analysis In Modern Era, New Delhi, Common wealth, (1991) P.No. 97-105